भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसुचित जाती/अनुसूचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र.साप्रोयो-२०२१/प्र.क्र.१४२/उद्योग-८
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १८ जानेवारी, २०२२,

<u>संदर्भ:</u>- १) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१३/प्र.क्र.५४/ उद्योग-८,दि.०१/०४/२०१६
२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र.१३३/ उद्योग-८,दि.११ फेब्रुवारी,२०१६
३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र.१३३/ उद्योग-८,दि. ११ मे,२०१६
४) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र.१३३/ उद्योग-८,दि. १३.०७.२०१६
५) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र.१३३/ उद्योग-८,दि. ०५.०१.२०१७
६) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र.१३३/ उद्योग-८,दि. ११.०४.२०१९
७) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. मऔधो-२०१९/प्र.क्र.६/ उद्योग-२,दि.०७ मार्च,२०१९
८) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१९/प्र.क्र.४६/ उद्योग-८,दि.१६ सप्टेंबर,२०१९

<u>प्रस्तावना</u>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती निमित्त राज्यातील अनुसूचित जाती/जमाती उद्योजकांना उत्तेजन देऊन त्यांना स्वयंपूर्ण व आर्थिक दृष्टया स्वावलंबी करण्याच्या उदेृषाने राज्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/जमाती) उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहन योजना राबविण्याबाबत संदर्भाधीन क्र. २ येथील दि.११ फेब्रुवारी,२०१६ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते. तसेच यानुषंगाने संदर्भाधीन क्र. ३ येथील दि.११ मे,२०१६ च्या शासन निर्णयान्वये सदरहू योजनेची मार्गदर्शक तत्वे देखील निर्गमित करण्यात आली आहेत.सदरहू दि.११ मे,२०१६ च्या शासन निर्णयातील **परिच्छेद क्र.४ मध्ये** या योजनेचा कार्यप्रवण कालावधी पुढील आदेशापर्यंत चालू राहील असे नमूद करण्यात आले आहे. त्याचबरोबर सामुहिक प्रोत्साहन योजनेत भविष्यात होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने समुचित सुधारणा प्रस्तुत योजनेत यथावकाश करण्यात येतील असे देखील नमूद केले आहे.

महाराष्ट्राचे **नविन औद्योगिक धोरण-२०१९** संदर्भाधीन क्र. ७ येथील दि.०७ मार्च,२०१९ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात येऊन, त्यानुषंगाने संदर्भाधीन क्र. ८ येथील दि.१६ सप्टेंबर,२०१९ च्या शासन निर्णयान्वये, सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचा कालावधी दि.०१.०४.२०१९ ते दि.३१.०३.२०२४ किंवा नविन सामुहिक प्रोत्साहन योजना अंमलता येईपर्यंत राहणार आहे. त्यामुळे दि.११ मे,२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्यानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब

आंबेडकर (अनुसूचित जाती/जमाती) उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहन योजनेचा शासन निर्णय दि.११ फेब्रुवारी,२०१६ मधील परिच्छेद २,६,७ व ८ मध्ये सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ चा शासन निर्णय दि.१६.०९.२०१९ नुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्रक :-**

संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र.१३३/उद्योग-८,दि.११ फेब्रुवारी,२०१६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

**परिच्छेद क्र.२) योजनेची व्याप्ती:-** सदर परिच्छेदातील ब) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

ब) शासन निर्णय उद्योग विभाग, दि.१६.०९.२०१९ अन्वये विहित सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ च्या मार्गदर्शक तत्वातील परि. १.२ अन्वये उत्पादक उद्योगांची व्याप्ती

**परिच्छेद क्र. ६) विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेचे विहित निकष:-** सदर परिच्छेदातील अ,ब,क व ड मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

पात्र उद्योगांना प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ मधील विहित निकषांची पूर्तता करत असल्यास खालील विशेष प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

अ) प्रस्तुत योजनेतंर्गत सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ मधील अ व ब प्रवर्गातील क्षेत्रांना साप्रोयो-२०१९ चे **क** प्रवर्गातील लाभ अनुज्ञेय राहतील. घटकाच्या पात्रतेसाठी घटक ज्या क्षेत्रात आहे त्याचे निकष विचारात घेतले जातील.

ब) प्रस्तुत योजनेतंर्गत सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९मधील क व ड प्रवर्गातील क्षेत्रांना साप्रोयो-२०१९ चे ड+ प्रवर्गातील लाभ अनुज्ञेय राहतील.

क) प्रस्तुत योजनेतंर्गत सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ मधील ड+ प्रवर्गातील क्षेत्रांना विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व धुळे प्रवर्गातील क्षेत्रांना विना उद्योग जिल्हे, नक्षलप्रवन क्षेत्र, आकांक्षी जिल्हे प्रवर्गातील लाभ अनुज्ञेय राहतील.

ड) उपरोक्त लाभ सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत नवे व विस्तारीत उत्पादन उद्योगांना लागू रहातील.

**परिच्छेद क्र ७) भांडवल अनुदान : -**

| अ.क्र | **सा.प्रो.यो -२०१९ नुसार तालुका वर्गीकरण** | स्थिर भांडवली गुंतवणूकीची टक्केवारी | कमाल भांडवली अनुदान (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| १. | अ व ब | १५% | १५ |
| २) | क | १५ % | १५ |
| ३) | ड | २०% | २० |
| ४) | **ड+,विदर्भ,मराठवाडा,रत्नागिरी,सिंधुदुर्ग व धुळे** | २५% | २५ |
| ५) | **ना उद्योग जिल्हा /नक्षल प्रभावी क्षेत्र/ आकांक्षीत जिल्हे** | ३०% | ३० |

**परिच्छेद क्र. ८) वीज दर अनुदान: (संदर्भ-शासन शुध्दीपत्रक दि.१३.७.२०१६ व दि.११.४.२०१९नुसार)**
प्रस्तूत प्रयोजनार्थ आवश्यक निधी उद्योग विभागाकडे सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाने उपलब्ध केलेल्या निधीतून भागविण्यात येईल.

**प्रस्तुत प्रयोजनार्थ आवश्यक निधी सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत उद्योग विभागाकडे सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाने उपलब्ध केलेल्या निधीतून भागविण्यात येईल.**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक क्र. **२०२२०११७१५०७०६९२१०** असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

Ravindra V Gurav

Digitally signed by Ravindra V Gurav
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY, LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92,
pseudonym=B67CC3974B29D17A658E4CE714FCD068FD7E189B,
serialNumber=9DFB7AEFBD9E82B129C324D567B46E1D853D93C38D6E222C868EAC72ECD12784, cn=Ravindra V Gurav
Date: 2022.01.18 12:11:43 +05'30'

**(रविंद्र गुरव)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व संबंधित मा.मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व संबंधित मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र , मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर,
११. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र मुंबई
१२. महालेखापाल (लेखा परिक्षा)-२ महाराष्ट्र नागपूर
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी मुंबई.
१६. विकास आयुक्त तथा उद्योग संचालक, नवीन प्रशासन इमारत, पहिला मजला मंत्रालय, मुंबई-३२.
१७. Dalit Indian Chamber of Commerce & Industry.
१८. सर्व कार्यासने , उद्योग विभाग, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२